नि.दि. दावा क्र. १३२४/२०१६
नि.क्र. ३३

**<u>वादी तर्फे साक्षीदार क्र. १ चा सरतपास विधीज्ञ श्री. वाय. बी. हासे यांच्याकडून सुरु.</u>**

१. मला माझे पुराव्याचे शथपत्र वाचून दाखवले त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. यादी नि. ३ वर दाखल केलेले ॲसेसमेंट उता–यास **नि. ४४** देण्यात येते. यादी नि. ३१ वर दाखल केलेले ७/१२ उता–यास **नि. ४५** देण्यात येते. यादी नि. ३९ वर दाखल केलेल्या ७/१२ उता–यांना अनुक्रमे **नि. ४६ व ४७** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**<u>प्रतिवादी क्र. १ तर्फे साक्षीदार क्र. १ चा उलटतपास विधीज्ञ श्री. जे. के. पवार यांच्याकडून सुरु.</u>**

२. माझे इयत्ता सातवी पर्यंत शिक्षण झाले आहे. माझी जन्म तारीख २७/०२/१९८३ आहे. आज रोजी मी माझ्यासाठी व प्रतिवादी क्र. २ ते ४ साठी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ७८ वडीलोपार्जीत आहे. गट नं ७८ हा पूर्व-पश्चिम लांबीचा आहे. गट नं. ७८ चे पूर्वी एकूण क्षेत्र किती होते हे मी सांगू शकत नाही. दाव्यातील मिळकतीचे चतुर्सिमा मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील विनायक व प्रतिवादी क्र. १ हे सख्खे भाउ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ७८ हा नाशिक-पुणे मुळ रस्त्याच्या पश्चिमेस आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ७८ मधील १०० फुट पूर्वेकडून अंतर सोडून अडीच आर क्षेत्र प्रतिवादी क्र. १ ला माझे वडीलांनी विक्री केले. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ ने खरेदी घेतलेल्या मिळकतीला लागून पश्चिम बाजूने आमचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ ने घेतलेले अडीच आर क्षेत्र हे पुर्व-पश्चिम असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीने सदर क्षेत्रात पश्चिम बांधा लगत घर बांधले आहे. तेथे त्याचा संडास पण आहे. घराच्या पूर्वेस मोकळी जागा आहे. हे म्हणणे खरे नाही की, ०.२७.५० आर क्षेत्र हे गट नं. ७८ मध्ये तीन ठिकाणी विभागले आहे. साक्षीदार स्वत: सांगतो की, ०.२७.५० आर क्षेत्र हे दोन ठिकाणी आहे. १०० फुट अंतर कोणाचे मालकीचे आहे हे मला माहिती नाही. हे

म्हणणे खरे नाही की वर नमुद केलेले १०० फुट मिळकत ही आमच्या मालकीची होती. माझ्या वडीलांनी गट नं. ७८ मधील क्षेत्र सात आठ लोकांना खरेदीने दिले असेल. हे म्हणणे खरे आहे की, जुना नाशिक पुणे रस्त्याला लागून १०० फुट सोडून ०.२.५ आरक्षेत्रा प्रतिवादी क्र. १ ला दिलेल्या क्षेत्राचा गट नं. ७८/४ आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ च्या मिळकतीला लागून पश्चिमेकडील दीड आर क्षेत्र आमचे आहे. त्यात आमचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या मिळकतीला लागून पश्चिमेकडील ०.०१ आर क्षेत्र हे नानुबाई बाबासाहेब भारती यांना दिलेले आहे . हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये नानुबाईचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ७८ पैकी ०.०२ आर क्षेत्र रामदास गाडेकर यांना दिले आहे. त्याचा गट नं. ७८/३ आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये रामदासचे मसाला कांडप मशिन आहे. गट नं ७८ पैकी ०.०४ आर क्षेत्र भगवंता भुजबळ, सुदाम गाडेकर, वसंत गाडेकर व ज्ञानदेव गाडेकर यांना दिले आहे हे मला माहित नाही. व त्याचा गट नं. ७८/२ आहे हे माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, पश्चिमेकडील ०.०१ आर क्षेत्र माधव गफले यांना दिले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याचा गट नं. ७८/१/२ आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या मिळकतीत गफले यांची दोन मजली इमारत आहे. हे म्हणणे खरे आहे की, गफले यांच्या पश्चिमेकडील ०.०१ आर क्षेत्र राजेंद्र आंधळे यांना दिलेले आहे. त्यामध्ये त्यांचे पत्रयाचे घर आहे. त्याचा गट नं. ७८/१/१ आहे. हे म्हणणे खरे नाही की, आंधळे यांच्या पश्चिमेकडील आमचे उर्वरित ०.२३ आर क्षेत्र आहे. साक्षीदार स्वत: सांगतो की उर्वरित क्षेत्र ०.२७.५० आर आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याचा गट नं. ७८/१ आहे. आमचे एकूण ०.२९ आर क्षेत्र आहे हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मुळ नाशिक-पूणे रस्त्याला लागून असलेले ०.२ आर क्षेत्र आमचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ७८ मधील सहकब्जेधारकांना गट नं. ७८ च्या उत्तरेकडील बांधालगत ७ फुट पूर्व पश्चिम रस्ता दिलेला आहे.

३. हे म्हणणे खरे आहे की, नाशिक-पुणे मुळ रस्त्याचे रुदींकरण झाले आहे व त्या महामार्गाच्या पश्चिम बाजूस लागून सर्व्हीस रोड आहे. हे म्हणणे खरे नाही की, महामार्गाच्या पश्चिमेस प्रतिवादी क्र. १ चे ०.२.५ आर क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे नाही की,

मूळ नाशिक पूणे रस्त्याला लागून असलेले १०० फुट लांबी रुंदीचे ०.२ आर क्षेत्र आमचे संपादित झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, ज्या वेळी महामार्गाचा सर्व्हे झाला त्या वेळी माझे वडीलांनी प्रतिवादीचे क्षेत्र दाखवले. हे म्हणणे खरे नाही की, त्या प्रमाणे रेकॉर्ड तयार झाले. भूसंपादन अधिका-याने प्रतिवादी क्र. १ ला दिनांक २७/०८/२०१५ रोजी नोटीस दिल्याचे मला माहित नाही. त्या नोटीस ला प्रतिवादी क्र. १ ने वेळच्या वेळी उत्तर दिल्याचे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ ने माझे व भूसंपादन अधिका-याविरुद्ध नियमित दिवाणी दावा क्र. ४७०/२०१७ दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या दाव्यात प्रतिवादी क्र.१ ने गट नं. ७८ ची मोजणी केली. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यात मी मोजणी करणेकामी अर्ज दिला होता व तो अर्ज नामंजूर झाला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दावा दावामिळकतीची मोजणी होवून मिळणेसाठी दिला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यासोबत कच्चा हात नकाशा दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ७८ ची फाळणी झालेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ७८ च्या सात ते आठ सह हिस्सेदारांना दाव्यात पक्ष केलेले नाही. प्रतिवादी क्र. १ ने दावा मिळकतीत अतिक्रमण करुन कब्जा करण्याची व हरकत अडथळा करण्याची धमकी सन २०१९ मध्ये केली. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ ने कधीही आमच्या मिळकतीत अतिक्रमण केले नाही व अडथळा केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, चुकीची माहिती देवून चुकीच्या रेकॉर्ड चा फायदा घेवून प्रतिवादीची मिळकत बळकवण्याकरिता सदरचा खोटा दावा केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

दि. १७/१२/२०२५

(श्रीमती डी.पी. कडुस्कर)
२रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,

संगमनेर, जि.अहमदनगर.